दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १०३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.७ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# ३० वर्षे युतीत एकत्र असताना काही घडले नाही तर आता काय घडणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर शिवसेना आणि भाजपची पुन्हा मैत्री होणार, नितीश कुमार यांच्या 'बिहार पॅटर्न'चा अवलंब करत उद्धव ठाकरे हे काँग्रेस व राष्ट्रवादीची साथ सोडून भाजपसोबत जाणार, असे तर्क लावले जात असतानाच मुख्यमंत्री ठाकरे यांनी आज याबाबत आपली भूमिका मांडला स्पष्ट केले की, ३० वर्षे आम्ही युतीत एकत्र असताना काही घडले नाही तर आता काय घडणार आहे? असा प्रतिप्रश्न केला.

विधिमंडळाच्या दोन दिवसीय पावसाळी अधिवेशनाचे आज सूप वाजले. त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री ठाकरे यांना शिवसेना भाजप मैत्रीबाबत विचारणा करण्यात आली. दोन्ही पक्ष पुन्हा एकत्र येण्याची किती शक्यता आहे, असे विचारले असता आपल्या खास शैलीत ठाकरे यांनी उत्तर दिले.

पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री ठाकरे यांच्या एका बाजूला अजित पवार तर दुसऱ्या बाजूला बाळासाहेब थोरात होते. त्यांच्याकडे बोट दाखवत 'मी या दोघांच्या मध्ये बसलो आहे. तेव्हा तुम्हीच सांगा आता यांना सोडून मी कुठे आणि कसा जाणार?, असा प्रतिसवाल मुख्यमंत्री ठाकरे यांनी केला. या उत्तराने पत्रकारांमध्येही हंशा पिकला. मात्र पुन्हा हाच प्रश्न पत्रकारांनी



विचारला असता, उद्धव ठाकरे यांनी तशी शक्यता फेटाळून लावली. ३० वर्षे आम्ही युतीत एकत्र असताना काही घडले नाही तर आता काय घडणार आहे?, असा सवाल करत महाविकास आघाडी भक्कम असल्याचे सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मुख्यमंत्री ठाकरे यांनी यावेळी विधानसभा अध्यक्षांच्या निवडणुकीवरही भूमिका मांडली. सध्या करोना स्थिती असल्याने विधानसभा अध्यक्षांची निवडणूक घेण्यात अडसर असल्याचे मी राज्यपालांना कळवले आहे. परिस्थिती नियंत्रणात आल्यावर निश्चितपणे प्राधान्याने ही निवडणूक घेतली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

ओबीसींच्या आरक्षणासाठी लागणारा डेटा केंद्राकडे आहे. पंतप्रधानांची भेट घेतली त्यावेळी केलेल्या मागण्यांमध्ये एक मागणी इम्पेरिकल डेटा राज्य सरकारला द्यावा या संदर्भात देखील होती. त्यानंतर राज्यपालांची भेट घेऊनही तिच मागणी आम्ही पत्राद्वारे केली. राज्य सरकारकडे कोणतीही माहिती नाही. पण केंद्राकडचा इम्पेरिकल डेटा निरुपयोगी ठरणार असल्याचं सांगितलं जातंय. त्यात ८ कोटी चुका असल्याचं विरोधी पक्षनेत्यांनी म्हटलं. मग त्यांना ही माहिती कुणी दिली? राज्य सरकारला डेटा मिळत नाही. त्याबद्दल कोणतीही माहिती सरकारकडे नाही. मग त्या डेटामध्ये ८ कोटी चुका असल्याची माहिती विरोधी पक्षनेत्यांच्या कानात कुणी येऊन सांगितली?, असा टोला उद्धव ठाकरे यांनी यावेळी लगावला. यासोबतच केंद्राकडे असलेल्या डेटामध्ये ८ कोटी चुका असतील असं जर विरोधी पक्षनेत्यांचं म्हणणं असेल तर तो डेटा पंतप्रधान योजनांसाठी वापरला जातो, मग केंद्र सरकार घोटाळा करतंय का? असं आपण म्हणायचं का? केंद्र सरकार चुकीचा डेटा वापरुन योजना राबवतंय असा याचा अर्थ होत नाही का?, असे प्रश्न उद्धव ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केले.

## संक्षिप्त...

### जबरी चोरीतील आरोपी पनवेल गुन्हे शाखे कडून जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जबरी चोरी प्रकरणातील पोलिसांना पाहिजे असलेल्या आरोपीला पनवेल गुन्हे शाखेकडून जेरबंद करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंग, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ.बी.जी. शेखर पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रवीण पाटील यांनी पाहिजे आरोपी यांचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याबाबत आदेशित केले होते.

त्यानुसार सहा पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल हे पाहिजे आरोपींचा शोध घेत असताना पो.उप.नि. वैभव रोंगे याना मिळालेल्या बातमी अन्वये पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्रमांक २५/२१ कलम ३९२, ३९४, ४२७, ५०४, ५०६, ३४,भा. द.वि. या जबरी चोरीच्या गुन्हा मधील पाहिजे आरोपी अशोक उर्फ कांच्या सुधाकर मस्के वय २५ वर्ष रा.कोपरखैरणे नवी मुंबई येथे असल्याची माहिती मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक गिरिधर गोरे यांच्या नेतृत्वा खाली स पो नि गणेश कराड, पो. उप.नि. वैभव रोंगे, स हा फो. सुदम पाटील, दीपक डोंगर, रूपेश पाटील यांनी सापळ लावून त्यास ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने दोन गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

सदर आरोपीस पुढील कारवाई कामी पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध संवर्गातील पदभरतीस शासनाची मान्यता : ना.अजित पवार

### तीन संवर्गात एकूण १५ हजार ५११ पदे भरण्यात येणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सन २०१८ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध संवर्गातील भरण्यात येणाऱ्या १५ हजार ५११ पदांच्या भरतीस राज्यशासनाने मान्यता दिल्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सांगितले.



कालच उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीचा कारभार गतिमान करताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांच्या सर्व जागा ३१ जुलै २०२१ अखेरपर्यंत भरण्यात येणार असल्याचे सांगितले होते.

आज विधानसभेत केलेल्या निवेदनात श्री. पवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे निकाल जलद गतीने पूर्ण करण्यासाठी उपाययोजनांबाबतचे ठोस निर्णय राज्य शासनामार्फत घेण्यात आले असल्याचे सांगितले.

ज्या विभागांची रिक्त पदे भरणे आवश्यक आहे अशा विभागांना रिक्त पदे भरण्याची मान्यता वित्त विभागाने दिली आहे. त्यामुळे आता सन २०१८ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणाऱ्या विविध संवर्गातील पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आलेली आहे. यानुसार गट अ मध्ये ४ हजार ४१७, गट ब मध्ये ८ हजार ०३१ आणि गट क मध्ये ३ हजार ०६३ अशी एकूण १५ हजार ५११ अशी तीन संवर्गातील रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ही रिक्त पदे भरताना पदांचे आरक्षण तपासून ती पदे भरण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही श्री. पवार यांनी आपल्या निवेदनात सांगितले.

## सिडकोतर्फे २०३ निवासी तसेच निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीकरिता उपलब्ध

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे तीन स्वतंत्र योजनांतर्गत, नवी मुंबईच्या विविध नोडमधील निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक वापराचे तब्बल २०३ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले असून सर्वसामान्य नागरिकांसह विकासक व बांधकाम व्यावसायिकांनाही यामुळे सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. सदर २०३ भूखंडांपैकी पहिल्या योजनेंतर्गत खारघर, कळंबोली आणि नवीन पनवेल (पू.) नोडमधील निवासी तथा वाणिज्यिक वापराचे १२; दुसऱ्या योजनेंतर्गत ऐरोली, घणसोली, खारघर, कळंबोली आणि पनवेल नोडमधील निवासी वापराचे १८२ आणि तिसऱ्या योजने अंतर्गत कोपरेखैरणे व नेरूळ नोडमधील निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक वापराचे ९ भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना नवी मुंबईमध्ये आपले हक्काचे घर साकारण्याबरोबरच बांधकाम व्यावसायिक व गुंतवणूकदारांना नवी मुंबईसारख्या पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण शहरामध्ये बांधकाम विकसित करण्याची संधी मिळणार आहे.




कोविड-१९ महासाथ व टाळेबंदीमुळे बहुतेक सर्व क्षेत्रांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांसह बांधकाम क्षेत्राला दिलासा मिळावा याकरिता सिडकोकडून सातत्याने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. २०३ भूखंडांच्या विक्रीच्या योजनेमुळे केवळ बांधकाम क्षेत्राला चालना मिळणार नसून शहराच्या अर्थचक्रासही पुन्हा गती प्राप्त होणार आहे.

सिडकोकडून सातत्याने, महामंडळाच्या मालकीचे नवी मुंबईतील निवासी, वाणिज्यिक, .../२

## पेण पोलिसांकडून सहा महिन्यात ६२ गुन्ह्यांचा यशस्वी तपास

**दै.रायगड नगरी । पेण**

संपूर्ण जगावर आलेला संकट कोरोनाच्या बंदोबस्ताचा मुख्य भार पोलिसांवर आहेच. मात्र हा संकट असताना सुद्धा पोलीस न दमता, न थकता चोवीस तास आपला कर्तव्य बजावत असतात. तरीही पेण तालुक्यातील वडखळ, दादर सागरी व पेण पोलिसांनी मागील सहा महिन्यात एकूण ६२ गुन्ह्यांचा यशस्वी तपास केला आहे. तर चोरीस गेलेल्या १७ लाखाचा माल मिळविण्यात यश प्राप्त केला आहे.

मधल्या काळात पेणमध्ये अनेक प्रकारच्या चोऱ्या, खून, बलात्कार, विनयभंग, अपघात अशा विविध प्रकारच्या घटना मोठ्या प्रमाणात घडल्या आहेत. मात्र नव्याने रुजू झालेल्या उप विभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील पेण पोलीस निरीक्षक गौरीप्रसाद हिरेमठ, वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार आणि दादर सागरी सहाय्याक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील व सहकारी अधिकारी व पोलिसांनी या गुन्ह्यांना लगाम लावला आहे. जानेवारी पासून ६२ गुन्ह्यांचा यशस्वी तपास केला आहे. यामध्ये चोरीचे २२, विनयभंग ४, खून ५, बलात्कार ४, खुनाचा प्रयत्न १, दारूबंदी १७, मारहाणीतून दुखापत ५, अपघातातून मयत झालेले ३, अट्रोसिटी १ अशा ६२ केसेसचा समावेश आहे. तर वडखळ पोलीस ठाणे हद्दीत आत्तापर्यंत ३१ लाख ९५ हजाराचा माल चोरीस गेला असून त्यापैकी १६ लाख ९८ हजार ९५० रुपयांचा माल मिळवण्यात यश संपादन केले आहे.

## गहाण ठेवलेले दागिने घेऊन ज्वेलर्स चालक भावासह फरार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील नावडे गावात सोन्या-चांदीच्या दागिन्यांचे श्री चावंडा ज्वेलर्स दुकान चालविणाऱ्या दोघा भावांनी त्याच भागातील १० व्यक्तींनी त्यांच्याकडे गहाण ठेवलेले सुमारे ७ लाख रुपये किंमतीचे २२३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने घेऊन पलायन केल्याचे उघडकीस आले आहे.

केशरसिंह खरवड आणि अमरसिंग खरवड अशी या दोघा भावांची नावे असून तळोजा पोलिसांनी या दोघा भावांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणातील फरार खरवड बंधुंनी मागील तीन चार वर्षापूर्वी तळोजा येथील नावडे गावातील मराठी शाळेजवळ श्री चावंडा ज्वेलर्स नावाने दुकान सुरु केले होते. त्यामुळे गावातील अनेकांनी या ज्वेलर्समधून दागिने खरेदी केले. तर काहींनी त्यांच्याकडील दागिने गहाण देखील ठेवले. याचाच फायदा उचलत खरवड बंधुंनी मागील वर्षी लॉकडाऊन लागल्याची संधी साधून दुकान बंद करीत त्यांच्याकडे लोकांनी ठेवलेले सर्व दागिने घेऊन पलायन केले.

लॉकडाऊनमुळे सर्वच दुकान बंद असल्याने चावंडा ज्वेलर्स देखील त्यामुळेच बंद असेल, असा लोकांचा समज झाला. मात्र, दुकान मालक दत्तात्रय कोळी यांनी ऑक्टोबर महिन्यात दुकानाचे टाळे तोडल्यानंतर खरवड बंधुंनी पलायन केल्याचे सदर भागातील रहिवाशांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी केशरसिंह खरवड आणि अमरसिंह खरवड या दोघांविरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या ज्वेलर्स चालकाकडे दत्तात्रय खानावकर यांनी ७५ हजार रुपये किंमतीचे २५ ग्रॅम सोन्याचे लॉकेट आणि चैन गहाण ठेवले होते. तसेच धनश्री गवळी यांनी दिड लाख रुपये किंमतीचे ५० ग्रॅम वजनाचे दागिने, प्रयागबाई वडजे यांनी ७२ हजाराचे २४ ग्रॅमचे दागिने, ज्योती नेवरेकर यांनी २० ग्रॅम वजनाचे दागिने, स्वाती खानावकर यांनी १ लाख रुपये किंमतीचे ३४ ग्रॅम वजनाचे दागिने, मिरा खुटारकर यांनी .../२

## सुधागडात कोव्हिड लसीकरण नोंदणीसाठी भल्या पहाटे गाठावे लागतेय पाली आरोग्य केंद्र

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

संपूर्ण देशामध्ये कोरोना लसीकरण करण्याची मोहीम शासनाकडून राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पाली, जांभूळपाडा, सिद्धेश्वर, खवली, नाडसुर या ठिकाणी कोरोना लसीकरण केंद्र आहे. पण प्राथमिक आरोग्य केंद्र पाली या ठिकाणी कोरोना लसीकरणाचा अजब गजब प्रकार पाहायला मिळत आहे. नागरिकांना कोरोना लसीकरण नोंदणीसाठी भल्यापहाटे आरोग्य केंद्रावर यावे लागत आहे. त्यामुळे रोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्तिती निर्माण झाली आहे. यापूर्वीच्या लसीकरण प्रक्रियेदरम्यान सावळा गोंधळ दिसून येत होता, पुन्हा तीच परिस्थिती उदभवल्याने यावर वरिष्ठांकडून योग्य ती उपाययोजना व्हावी अशी मागणी जोर धरत आहे.



सुधागड तालुका हा रायगड जिल्ह्यातील डोंगराळ तालुका असून आदिवासींचे बांधवांचे मोठे प्रमाण तालुक्यात आहे. यामुळे सुधागड तालुक्याला आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो, यातील अनेक गावे, आदिवासी वाड्या हे डोंगरवर वसलेले आहेत. पाली प्राथमिक आरोग्य केंद्र पालीमध्ये कोरोना लसीकरणासाठी सुधागड तालुक्यातील अनेक गावातील व आदिवासी वाडीतील नागरिक दूरवरून दररोज पालीत येतात. पाली आरोग्य केंद्रामध्ये दिवसाला कोरोना लसीचे ४० ते ५० डोस उपलब्ध असतात. यामुळे तालुक्यातून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी व मिळणारे डोस हे खूपच कमी आहे. यामुळे त्यांना रिकाम्या हाताने परत जावे लागते. तसेच कोरोना लसीकरण करण्यासाठी नोंदणीची आवश्यकता असते. नोंदणी असेल तर कोरोनाची लस नागरिकांना देण्यात येते. परंतु तालुक्यातील नेटवर्कची कमतरता, इंटरनेट ची सुविधा मोबाईल रेंज चा प्रॉब्लेम यामुळे कोरोना लसीकरण नोंदणी ऑनलाइन प्रकारे नागरिकांना करताना अनेक अडचणी येतात तसेच काहीना इंटरनेटची माहिती नसल्यामुळे नोंदणीही करू शकत नाही.

तालुक्यातील अनेक नागरिक लसीकरण नोंदणी संदर्भातील अनेक अडचणीमुळे सरळ प्राथमिक आरोग्य केंद्र पाली येथे कोरोना लस घेण्यासाठी येतात. ही नोंदणीची वेळ पाली आरोग्य केंद्राकडून सकाळी ९ नंतर ठेवण्यात येते. परंतु ही नोंदणी प्रत्यक्षात पहाटे तीन ते चार, साडेचार या वेळेमध्ये करण्यात येत, ही धक्कादायक गोष्ट समोर आली आहे. यामुळे नागरिकांना पहाटे तीन ते चार वाजता प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोरोना लसीकरण नोंदणी करण्यासाठी यावे लागत .../२

## पनवेलमधील खाजगी रूग्णालयांना प्राप्त होणार लस साठा : गणेश देशमुख

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबईस्थित एका नामांकित संस्थेच्यावतीने पनवेल कार्यक्षेत्रातील ज्या रूग्णालयांना कोविड लसीकरणाची परवानगी मिळाली आहे अशा रूग्णालयांना लवकरच कोविड लसींचा साठा प्राप्त होणार आहे. ज्या नागरिकांना खाजगी रूग्णालयात जाऊन लस घेणे शक्य आहे त्यांनी या रूग्णालयांमध्ये जाऊन लसीकरण करून घ्यावे असे आवाहन पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.



कोरोनाची दुसरी लाट ओसरत आली असली तरी अजूनही कोरोनाचा धोका टळळेला नाही. डेल्टा प्लस या कोरोनाच्या उत्परिवर्तित विषाणूचा धोका वाढला आहे. तसेच कोरोनाची तिसरी लाट येत्या सप्टेंबर- ऑक्टोबरमध्ये येणार असल्याचे भाकित वैद्यकिय क्षेत्रा-तील तज्ज्ञांकडून केले जात आहे. सद्य परिस्थितीत कोरोनावरती लसीकरण हा एकच उपाय मानला जात आहे. त्यामुळे जास्तीत नागरिकांचे लसीकरण होणे गरजेचे आहे.

पनवेल महानगरपालिका आपल्या १८ लसीकरण केंद्रांच्या माध्यमातून लसीकरण करते आहे. मात्र गेल्या काही दिवसापासून पनवेल कार्यक्षेत्रातील शासकिय लसीकरण केंद्रे लसींचा तुटवडा असल्या कारणाने बंद ठेवावी लागत आहे. आयुक्त .../२

# अखेर बारा वाजलेच!

महाराष्ट्रातील सत्ताधारी आणि विरोधक यांनी बराच काळ सामान्य माणसाच्या आकांक्षा आणि अपेक्षांशी द्रोह करणारे जे हीणकस राजकारण चालविले आहे, त्याने आता नवा कळसाध्याय गाठला आहे. ज्या विधिमंडळ सभागृहांना विशेषाधिकार असतात आणि त्यांच्या अशा अधिकारांमुळे अनेकांना शिक्षा भोगाव्या लागल्या आहेत; त्या सभागृहाचे सभासद 'आयाबहिणीवरून शिव्या' दिल्याचा परस्परांवर आरोप करीत होते. याहून खालची पातळी आणखी कोणती गाठायला हवी? कॉलरला रूमाल लावून चौकाचौकात दादागिरी करणारे गुंड यापेक्षा बरी भाषा वापरतात. या साऱ्या तमाशामध्ये मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्याचे दोन्ही बाजूंकडून केवळ 'राजकीय प्यादे बनविण्यात आले आहे. महाराष्ट्रातले सारे राजकारणी या दोन्ही समाजांची फसवणूक करण्यासाठी कोणत्या पातळीवर उतरू शकतात, याचा विषण्ण करणारा अनुभव सध्या येतो आहे. विधानसभेच्या कामकाजातही मंत्री छगन भुजबळ यांनी मांडलेला ठराव हीच गोंधळाची सुरुवात ठरली. केंद्र सरकारकडे असणारा ओबीसींच्या वर्गवारीचा तपशील इतर कारणांसाठी वापरता, मग तो आरक्षणासाठी का वापरू नये? असा सवाल करीत भुजबळांनी हा ठराव मांडला. तो घाईघाईत मंजूरही झाला. यावेळी भुजबळांच्या युक्तिवादाला विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस उत्तर देत होते. मात्र, या साऱ्या शाब्दिक चकमकी, ठराव मंजूर करण्याची घाई आणि एकमेकांवर होणारे आरोप यातून ओबीसींच्या हितापेक्षा कुरघोडीचे राजकारण करण्याची धडपड स्पष्ट दिसत होती. याच कुरघोडीचे शेवटचे टोक १२ आमदारांच्या एका वर्षाच्या निलंबनातून गाठले गेले. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सत्ताधारी आघाडीने पाठविलेली विधान परिषदेच्या बारा आमदारांची नावे अडकवली आहेत. त्या आकड्याची बरोबरी भाजपच्या नेमक्या बारा आमदारांना निलंबित करून गाठली गेली. बारा या आकड्याला आपल्या संस्कृतीत बरेच महत्त्व आहे! मात्र, एका वर्षासाठी निलंबित केलेल्या सगळ्या बारा आमदारांनी सभागृहात गैरवर्तन केले होते का? आणि अध्यक्षांच्या दालनात गैरवर्तन करणारे केवळ एकाच पक्षाचे आमदार होते की, इतरही पक्षांचे आमदार होते? शिवाय, सभागृहाच्या बाहेरचे वर्तन अशा कारवाईसाठी पात्र असते का, असाही प्रश्न पडू शकतो. लोकशाहीची खरेच चाड असेल तर या दालनातील सगळ्या संवाद व शिव्यांचे सीसीटीव्ही फुटेज महाराष्ट्राला अनकट् दाखवावे. खरेतर, संसदेप्रमाणे विधिमंडळातही सदस्यांच्या वर्तनाची चौकशी किंवा खातरजमा करणारी नैतिक वर्तन समिती असायला हवी. तसा प्रस्ताव मागे आला होता. त्याचे काय झाले? अशी समिती असती तर त्या समितीकडे हे सारे प्रकरण पाठवता आले असते. सध्या महाराष्ट्राच्या विधानसभेला अध्यक्ष नाही. त्यामुळे, उपाध्यक्ष किंवा तालिका समितीच्या सदस्यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज चालते. असेच तालिका सदस्य असणारे भास्कर जाधव हे स्वत: सकाळी सदस्य म्हणून आक्रमक होते. त्यांची व विरोधकांची शाब्दिक चकमकही झाली. काही काळाने त्यांच्याच नेतृत्वाखाली या आमदारांवर कारवाई व्हावी, हा केवळ योगायोग आहे. भाजपच्या बारा आमदारांवर झालेल्या कारवाईमुळे अनेक गोष्टी साधल्या आहेत. एकतर, गेले काही दिवस विस्कळित वाटणाऱ्या सत्ताधारी आघाडीची बांधबंदिस्ती या निमित्ताने आपोआप झाली आहे. महाराष्ट्रातील नेत्यांवर विविध यंत्रणा ज्या कारवाया करीत किंवा करू इच्छित आहेत, त्यालाही सत्ताधारी आघाडीने हे एक जोरदार उत्तर दिले आहे. मात्र, या निलंबनाचा आणि अध्यक्षीय निवडणुकीचा काही संबंध नाही. याचे कारण, निलंबित सभासदांना निवडणूक झालीच तर मतदान करता येते, असे या आधीचे दाखले आहेत. केवळ दोन दिवसांचे अधिवेशन असताना तेही सत्ताधारी व विरोधकांना सामंजस्याने चालवता येऊ नये, या सारखे महाराष्ट्राचे दुसरे दुर्दैव नाही. करोनाचा विषय तर आहेच, पण सकाळी सभागृहात उपस्थित झालेले विलंबित एमपीएससी परीक्षा, स्वप्नील लोणकरची आत्महत्या व इतर महत्त्वाचे विषय या गोंधळात अक्षरश: वाहून गेले. महाराष्ट्र विधिमंडळाचे करोनामुळे कमी काळात उरकावे लागणारे हे तिसरे अधिवेशन आहे. नेहेमीच्या कामकाजाच्या पाच टक्के वेळही त्यामुळे सदस्यांना मिळालेला नाही. असे असताना हा वेळ गंभीर चर्चे साठी वापरावा, राज्यापुढचे आरोग्य यंत्रणा किंवा घसरत्या अर्थकारणाचे प्रश्न मुद्देसूद, सविस्तर चर्चेला घ्यावेत, असे या आमदारांना आणि सरकारला वाटते की नाही? गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्राचे राजकारण वाढत्या क्रमाने नासत चालले आहे. विविध केंद्रीय यंत्रणांची सतत दहशत घालणाऱ्या केंद्र सरकारचाही यात दोष आहे. महाराष्ट्राचे राजकारण हळूहळू टोळीयुद्धाच्या पातळीवर चालले आहे. या टोळीयुद्धाचा एक नवा अध्याय सुसंस्कृत महाराष्ट्र मान खाली घालून पाहतो आहे.

# उरणमध्ये १५६ दिव्यांग बांधवांचे लायन संदीप म्हात्रे यांच्या वतीने कोविड लसिकरण



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण मधील दिव्यांग बांधवांच्या कोविड लसिकरणासाठी, लायन्स क्लबचे डिस्ट्रिक चेअरपरसन मेडीकल एड, लायन संदिप म्हात्रे हे दिव्यांग बंधू धावत आले आहेत. त्यांनी १५६ कोविशील्डचे डोस मोफत देवून संपूर्ण लसिकरणाचा खर्च स्वतः केला आहे.

सदर लसिकरण शिबीर लायन्स क्लब ऑफ नवीमुंबई च्याम्पियन, उरण मेडिकल वेल्आफेअर आसोशिएशन , व बेरोजगार अपंग जीवन विकास समाजकल्याण संस्था उरण यांच्या संयुक्त विद्यमाने, उरण मधील डॉ सत्या ठाकरे यांच्या उरण कोटनाका येथील शारंधर हॉस्पिटल करण्यात आले असून या लसिकरण शिबीराचे उदघाटन लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रीक्ट चे गव्हरनर लायन एल.जे.टावरी यांच्या हस्ते करण्यात आले.

कोरोना महामारीत दिव्यांग बांधव आपल्या उदार्निर्वाहासाठी झुंझत असतांना, कोरोना लसीकरणासाठी त्यांच्यासाठी प्रशासनाने कोणतीही वेगळी व्यवस्था केली नसल्याने, कोरोना लसीकरण करून घेणे हि त्यांच्यासाठी कठीण झाल होत. त्यांची हि अडचण लक्षात घेता, स्वतः दिव्यांग असलेले, व उरण तेलीपाडा येथील रहिवाशी लायन्स क्लबचे डिस्ट्रिक चेअरपरसन मेडीकल एड, लायन संदिप म्हात्रे हे दिव्यांग बंधू धावत आले, व त्यांनी उरण येथे तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी कोरोना लसीकरण शिबीराच आयोजन केले. या शिबिरात १५६ दिव्यांग बांधवांनी कोरोनाचा पहिला डोस घेतला आहे.

यावेळी लायन संदिप म्हात्रे, डॉ.सत्या ठाकरे, डॉ.विकास मोरे, समाजसेवक संतोष पवार, प्राध्यापक राजेंद्र मढवी, महेंद्र म्हात्रे हे उपस्थित होते. यावेळी दिव्यांग बांधवांनी व उपस्थितांनी लायन संदिप म्हात्रे यांचे कौतूक करून त्यांचा सारख्या समाज कार्याची समाजाला गरज असल्याचे म्हटले.

# सुधागडात वनविभागाकडून १५ हजाराचा पशुधन नुकसान रुपयांचा भरपाई धनादेश वाटप

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



सुधागड तालुक्यातील दर्यागाव येथे २६ एप्रिल २०२१ रोजी जाण्या भागू फसाळ. दर्यागाव यांच्या भातशेती लगत एका बिबट्याया वन्य प्राण्याने गायवर हल्ला केला या हल्लात गाय मयत झाली. हि असल्याची माहिती मिळताच घटनेच्या ठिकाणी जाऊन पशुवैद्यकीय अधिकारी सुधागड पाली यांना घेऊन सदर जागेवर जाऊन पंचनामा करण्यात आले. सदर शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी जाण्या भागू फसाळ यांनी वनविभागाकडे केली होती. या मागणीची दखल घेत समीर शिंदे वनपरिश्रेत्र अधिकारी सुधागड यांनी या शेतकऱ्याला लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी. या साठी प्रयत्न केले. या शेतकऱ्याला नुकसान भरपाई म्हणून १५ हजार रुपयांचा धनादेश संबधित शेतकऱ्याला देण्यात आले. वनविभागाकडून देण्यात आलेल्या नुकसान भरपाई बाबत शेतकऱ्याकडून हा समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी शेतकरी जाण्या भागू फसाळ रा.दर्यागाव, समीर शिंदे वनक्षेत्र अधिकारी सुधागड, वन परिमंडळ अधिकारी पाच्छापूर तसे लगतचे वनरक्षक बी.आर.माळी, ए.एस.सोळंके, एस.आर. गायकवाड हे उपस्थित होते.

# पनवेल तालुक्यातील कासारभाट येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ तारा करिता शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील ग्रामीण स्तरापर्यंतच्या विविध शासकीय यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यापैकी पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाहीदेखील प्रलंबित होती. मात्र पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.

त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबतीतही त्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यातील कासारभाट येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ तारा या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती, याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ग्रामपंचायत कर्नाळा (तारा) हद्दीतील मौजे कल्हे, ता.पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे.नं. १८३/अ येथील एकूण क्षेत्र ४-५०-०० हे.आर. पैकी ०-०५-०० हे.आर.जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही शासकीय जमीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड-अलिबाग यांच्याकडे कासारभाट येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ तारा करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला पशुवैद्यकीय सुविधा मिळण्याच्या दृष्टीने हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीकरिता उपलब्ध

सामाजिक व सांस्कृतिक उद्देशाकरिता असलेले विविध भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून दिले जातात. यामुळे शहराचा परिपूर्ण विकास साधण्याचे, महामंडळाचे उद्दिष्ट साध्य होते. पहिल्या योजने अंतर्गत सिडकोकडून खारघर, कळंबोली व नवीन पनवेल (पू.) नोडमधील एकूण १२ निवासी तथा वाणिज्यिक वापराचे भूखंड उपलब्ध करून देण्यात आले असून १९०२.४३ चौ.मी. ते ८१४३.३० चौ.मी. दरम्यानच्या क्षेत्रफळाचे हे भूखंड आहेत. दुसऱ्या योजने अंतर्गत ऐरोली, घणसोली, खारघर, कळंबोली आणि पनवेल नोडमधील मिळून एकूण १८२ निवासी भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर भूखंड हे लहान आकाराचे असून ४१.४१ चौ.मी. ते ३९१ चौ.मी. दरम्यानच्या क्षेत्रफळावर नागरीक बंगलो, रो हाऊस व व्हिला साकारू शकतात. तर तिसऱ्या योजने अंतर्गत कोपरखैरणे आणि नेरूळ नोडमधील मिळून ०९ निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले असून ७५३.०९ चौ.मी. ते १४०३.७० चौ.मी. दरम्यानच्या क्षेत्रफळाचे हे भूखंड आहेत. सर्व २०३ भूखंड हे किफायतशीर दरात उपलब्ध असून निर्वेध मालकी (क्लिअर टायटल) असणाऱ्या या भूखंडांना सिडकोची हमी आहे.

सदर तिन्ही योजना या ई-निविदा व ई-लिलाव पद्धीतीने पार पडणार आहेत. या तिन्ही योजनांकरिता निविदाकारांची नोंदणी, अर्ज सादर करणे, अनामत रकमेचा भरणा करणे, बंद निविदा सादर करणे, ई-लिलाव प्रक्रिया व योजना पुस्तिका इ. सर्व तपशील सिडकोच्या https://eauction.cidcoindia.com या ई-लिलाव संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपनगरी रेल्वे, महामार्ग व अंतर्गत रस्त्यांचे जाळे, यांमुळे नवी मुंबईला उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभली आहे. नजीकच्या काळात साकार होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे नवी मुंबई थेट जगाला जोडली जाणार आहे. तसेच सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेल्या मेट्रो प्रकल्पामुळे सार्वजनिक परिवहन सेवा अधिक सक्षम होणार आहे. नियोजित कॉर्पो रेट पार्क प्रकल्पामुळे शहराच्या वाणिज्यिक क्षमता मोठ्या प्रमाणावर वृद्धिंगत होणार आहेत. या तिन्ही योजनांद्वारे मोठ्या प्रमाणावर निवासी आणि निवासी तथा वाणिज्यिक भूखंड उपलब्ध करून देण्यात आल्याने अनेकांचे नवी मुंबईमध्ये आपले मनपसंत घर साकारण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्याचप्रमाणे, वाणिज्यिक बांधकामांमुळे शहराच्या विकासासही चालना मिळणार आहे.

## गहाण ठेवलेले दागिने घेऊन ज्वेलर्स चालक भावासह फरार

९० हजाराचे ३० ग्रॅम वजनाचे दागिने, चंद्रभागा ठाकूर यांनी १० हजार रुपयांचे ३.५ ग्रॅम वजनाचे दागिने, लतिका गवळी यांनी ३० हजार रुपये किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे दागिने तसेच ललिता म्हात्रे यांनी ६० हजार रुपये किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे दागिने तर अलका म्हात्रे यांनी २१ हजार रुपये किंमतीचे ७ ग्रॅम वजनाचे गहाण ठेवलेले होते. सदर सर्व दागिने घेऊन दोघा भावांनी पलायन केले आहे.

## नोंदणीसाठी भल्या पहाटे गाठावे लागतेय पाली आरोग्य केंद्र

आहे. या वेळेमध्ये रजिस्टर मध्ये नागरिकांची नोंद करून त्यांना सकाळी नऊ नंतर कोरोना लसीकरण कूपन देण्यात येते. यामुळे जे नागरिक सुधागड तालुक्यातील अनेक गावा, वाड्यातून येतात त्यांना सकाळी पहाटे तीन ते चारच्या दरम्यान पाली आरोग्य केंद्रात कोरोना लसीकरण करण्यासाठी यावे लागेल अशी बाब दिसून येते. ही बाब आता गंभीर स्वरूपाची झाली आहे.

एक तर सुधागड तालुक्यातील गावे ही डोंगर भागात वसलेले असल्यामुळे नागरिकांना पाली शहरात येण्यासाठी गाड्यांची सोय खूप कमी प्रमाणात असते. काही गावांना तर रस्ते आणि गाड्या सुद्धा जात नाहीत त्यातच येथील नागरिकांनी कोरोना लसीकरणासाठी एवढ्या पहाटे कशा प्रकारे येऊ शकतात ? आणि नागरिकांनी एवढ्या पहाटे कोरोना लसीकरणाची नोंदणी करण्यासाठी का यावे ? एखादया वेळेस पाली शहरात लसीकरण नोंदणीसाठी रात्रीअपरात्री येताना अपघात किंवा एखादी दुर्दैवी घटना घडली तर या घटनेला कोण जबाबदार असेल ? कोरोना लसीकरणाची ही नोंदणी नागरिकांना त्रासदायक ठरत आहे याकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष का होत आहे ? सकाळी ९ नंतरची वेळ कोरोना लसीकरण नोंदणी व कुपन देण्याची असतानाही पहाटे नोंदणी का करण्यात येत आहे ? यामागचे कारण काय? असे अनेक प्रश्न सुधागड तालुक्यातील नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. पाली आरोग्य केंद्रातील या प्रकारामुळे सुधागड तालुका यातील अनेक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे तसेच कामाचा वेळही यामुळे वाया जात आहे.

## पनवेलमधील खाजगी रूग्णालयांना प्राप्त होणार लस साठा : गणेश देशमुख

गणेश देशमुख यांनी मुंबईस्थित एका नामांकित संस्थेशी समन्वय साधून पनवेल महानगरपालिकेने ज्या रूग्णालयांना लसीकरणासाठी परवानगी दिली आहे अशा रूग्णालयांना लसींचा साठा प्राप्त करून देण्यात यश मिळवले आहे. विशेष म्हणजे या रूग्णालयांमध्ये कोविशिल्ड, को-वॅक्सीन, स्फुटनिक अशा तिन्ही प्रकारच्या लस नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ज्या नागरिकांना खाजगी रूग्णालयात जाऊन लस घेणे शक्य आहे त्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. महापालिकेने पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील एकुण ६१ खाजगी रूग्णालयांना लसीकरणासाठी परवानगी दिली आहे. यातील ११ खाजगी रूग्णालयांमार्फत कोविड लसीकरण सुरू करण्यात आले आहे. आता इतर रूग्णालयांना देखील कोविड लसींचा साठा प्राप्त करून देण्यात येणार आहे.

# रोहे तालुका कुणबी समाजाच्या वतीने सानप परिवाराप्रती ऋणनिर्देशन व्यक्त

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील संभे गावचे सुपुत्र प्रतिष्ठित नागरिक व तालुका कुणबी समाजाचे जेष्ठ नेते व माजी उपाध्यक्ष दिनेश सानप तथा दगडूखोत यांचेबुध. दि.३० जून रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.

समाजनेते दिनेश सानप तथा दगडूखोत यांनी आपल्या हयातीत समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल कुणबी समाजोन्नती संघ संलग्न ग्रामीण शाखा रोहे याच्या वतीने त्यांच्या कार्याबद्दल क्रुतज्ञतता पूर्वक ऋणनिर्दे शनाची भावना व्यक्त केली आहे.

तालुकाध्यक्ष शिवराम शिंदे व सर्व पदाधिकारी यांनी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून समाजाचा आधारवड गेला असल्याची भावना व्यक्त करून सरचिटणीस सुनील ठाकूर यांनी समाजाच्या वतीने त्यांच्याप्रती क्रुतज्ञपणाची भावना व्यक्त करून ऋणनिर्दे शन पत्र लिहून समाजाच्या त्यांच्याबाबत असणाऱ्या भावना या पत्रातून व्यक्त केल्या आहेत.

तसेच स्नेह ज्येष्ठ नागरीक कल्याणकारी मंडळ कोलाडचे संस्थापक-अध्यक्ष आणि रा. जि. ज्येष्ठ नागरीक संघाच्या समन्वय समितीचे माजी सदस्य आदी पदावर कार्य करून त्यांनी जेष्ठ नागरिकांसाठीही मोलाचे कार्य केले असल्याने जेष्ठ नागरिक मंडळाने त्यांच्या दु:खद निधनाप्रती शोक व्यक्त करीत कोलाड येथे शोकसभा आयोजित करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# पालीत आर्थिक आणि डिजिटल साक्षरता अभियान अंतर्गत महिला बचत गटांना योजनांची माहिती



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

ग्रामीण क्षेत्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेला वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही एकमेव शिखर संस्था आहे. शेती व ग्रामीण पतपुरवठ्यासंबंधीची जी कामे रिजर्व बँक करीत असे ती सर्व कामे नाबार्डकडे सोपविण्यात आली. नाबार्ड स्थापना दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पाली शाखेने नाबार्ड च्या विविध योजनांची माहिती महिला बचत गटांना व्हावी व त्यातून विकास साधावा या हेतूने या उपक्रमाचे आयोजन तालुक्यात पाली व आपटवणे येथे केले होते. यावेळी मोठ्या संख्येने महिला बचत गटातील महिला उपस्थित होत्या. यावेळी पाली शाखेचे शाखाधिकारी डी.के.देशमुख, शाखा निरीक्षक एन.एन. नागे तसेच कर्मचारी सुधीर साखरले व प्रशांत जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

सुधागड तालुक्यात रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नाबार्ड ने स्थापन केलेल्या महिला बचत माध्यमातून उत्तम प्रकारे कार्यरत आहेत. यावेळी बोलतांना शाखाधिकारी डी.के.देशमुख म्हणाले कि मागील दोन वर्षाच्या काळात वादळ वारा अशी नैसर्गिक आपत्ती आणि कोरोना महामारीच्या मोठ्या संकटाला हार न मानता सामोरे गेलो तसेच यापुढेही घाबरून न जाता हार मानायची नाही असा धीर यावेळी महिला बचत गटातील महिलांना दिला. बँकेच्या होम सेविंग, रिकरिंग, ठेव योजना, कर्ज योजना आदींची माहिती यावेळी देण्यात आली. एफ एल सी अंतर्गत बचत गट कार्यक्रमांतर्गत होम सेविंग ची एकवीस, सेविंग ची दहा, रिकरिंग ची पाच खाती अशी छत्तीस खाती नव्याने उघडण्यात आली.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**



**गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उरण तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ जासई करिता शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील ग्रामीण स्तरापर्यंतच्या विविध शासकीय यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यापैकी पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाहीदेखील प्रलंबित होती. मात्र पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे. त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबतीतही त्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यातील उरण येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ जासई या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती, याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ग्रामपंचायत जासई हद्दीतील मौजे जासई, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे.नं.८/१ येथील एकूण क्षेत्र ०-०९-७० हे.आर. इतकी जमीन महसूल मुक्त व सारामाफीने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड - अलिबाग यांच्याकडे जासई येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ जासई करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेचा लाभ घ्या : उज्वला बाणखेले

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी भात व नागली पिकासाठी पीक विमा योजना शासनाकडून सुरू केली आहे. यासाठी रायगड जिल्ह्याकरिता एच.डी.एफ.सी.इर्गोइन्शुरन्स कंपनी नेमलेली आहे. भातपीकासाठी विमा संरक्षित रक्कम रु.४५ हजार ५००/- असून विमा हप्ता रू.९१०/-प्रति हेक्टर म्हणजे प्रति गुंठयाला साधरणत: रक्कम रू.१०/-आहे.

तसेच नागली पिकासाठी विमा संरक्षित रक्कम रू.२० हजार असून विमाहप्ता रु.४००/-प्रति हेक्टर म्हणजे प्रति गुंठयाला साधरणत: रक्कम रू.४ अशी आहे. पावसातील खंड, पूर, दुष्काळ यामुळे शेतीचे नुकसान होऊन उत्पादन ५० टक्के पेक्षा कमी आल्यास विमा संरक्षण मिळते. विमा हप्ता भरण्याची अंतिम दि. १५ जुलै २०२१ आहे.

# माथेरान मधील संपूर्ण घडामोडी पर्यटनावर अधोरेखित

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील संपूर्ण जनजीवन हे पर्यटनावरच अवलंबून आहेच परंतु एकंदरीत इथल्या सर्व राजकीय, सामाजिक घडामोडींचा आलेख सुध्दा पर्यटनावर अधोरेखित आहे. पर्यटनातून रोजगार निर्मिती आणि याच माध्यमातून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेली सकारात्मक आणि व्यापक दृष्टिकोनातून साधकबाधक कार्यपद्धती अभिप्रेत आहे. पर्यटन हे केवळ इथल्या नैसर्गिकरित्या लाभलेल्या वनसंपदा आणि शुद्ध हवेच्या प्रदूषण मुक्त पर्यावरण आणि मुळातच इमानदारीने कार्यरत असलेल्या भूमिपुत्रांच्या स्वाभाविक गुणांमुळे आजमितीपर्यंत टिकून स्थापित आहे.





माथेरानला अनेक विकासात्मक आणि महत्वाकांक्षी कामे पूर्णत्वास जाण्यास एकविसाव्या शतकात सुध्दा आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आजही विलंब लागत आहे त्यामुळे हे गाव आणि गावातील स्थानिक भूमिपुत्रांना संघर्ष करावा लागत आहे तरीदेखील गावातील मुख्यतः ज्या ज्या समस्या आहेत त्या मार्गी लागेपर्यंत एक एक पिढी संपुष्टात येत आहे त्यामुळेच आधुनिक विज्ञान युगात वावरत असल्याचा साधा आभास देखील याठिकाणी जाणवत नाही या कारणास्तव हे गाव सोयी सुविधा पासून शापित असल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत आहे. आणि याला कारण म्हणजे इथली स्थानिक मंडळींचा एकोपा नसल्याने सरसकट सर्वानाच प्रत्येक वेळी काही ना काही समस्येचा सामना करावा लागत आहे. इथले पर्यटन अधिकाधिक कसे बहरेल मोलमजुरी करणाऱ्या श्रमिकांपासून ते उच्चभ्रू हॉटेल व्यावसायिक यांच्या उत्पन्नात वाढ होईल यासाठी केवळ गलिच्छ राजकारण आणि श्रेयवादा मुळेच आजवर समस्यांचे निराकरण होण्यासाठी प्रयत्न केला गेलेला नाही. इतर पर्यटनस्थळांच्या तुलनेने चिमूटभर मतदार संख्या असलेले हे खेडवजा शहर बिनशेतीचा संपूर्ण भूभाग आणि पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या या छोट्याशा गावात राजकारण ओतप्रोत भरलेले आहे. किंबहुना इथे कुठल्याही क्षेत्रात पदे मग ती कशी काय मिळवायची याची कला काही घराण्यांना आनुवंशिक पध्दतीने अंगीकृत आहेत. आपली पदे कायमस्वरूपी टिकविण्यासाठी कुणाच्याही पायघड्या घालण्यासाठी काही मंडळी साष्टांग लोटांगण घालण्यास अग्रेसर आहेत. याच पदांमधून पैसा आणि मोफत प्रतिष्ठा प्राप्त करण्यात हातखंडा दिसून येत आहे. चिरीमिरी साठी चार जणांचे संघटन प्रकाशात आणून आपली झोळी भरताना कुणीही आपल्या नेमलेल्या पक्षाला सुध्दा वेळेनुसार अप्रत्यक्षपणे राम राम करीत स्वार्थ साधताना दिसत आहेत. गावाची संपूर्ण घडामोडी ही पर्यटनावर अवलंबून असताना येणारा पर्यटक हा अतिथी म्हणून संबोधला जात असताना त्यांना काय मूलभूत सुविधा अपेक्षित आहेत याचा विसर पडलेला आहे. सध्याच्या यांत्रिक युगात प्लास्टिक मनी हीच खरी ओळख निर्माण झालेली असताना पर्यटकांना बाजारात खरेदीसाठी पैसा नसल्याने बँकेच्या गलथान कारभारा मुळे वेळेवर पैसा उपलब्ध होत नाही त्यामुळे वेळप्रसंगी गाडीभाडे सुध्दा खिशात शिल्लक रहात नाही अशा पर्यटकांना अत्यावश्यक बँकिंग सुविधा निर्माण करण्यासाठी लोकनियुक्त मंडळी पाठपुरावा करीत नाहीत. मुख्य प्रवेशद्वारा जवळील वस्तुस्थिती पाहूनच आपण आलो ती घोडचूक तर केली नाही ना अशीच परिस्थिती आजही याठिकाणी पहावयास मिळते. किंमती गाड्या वनखात्याच्या, वनसमितीच्या पोकळ भरवशावर ठेऊन गावात येताना त्यांच्या हृदयाला सुध्दा नक्कीच वेदना होत असतील यात शंकाच नाही. नगरपरिषदेच्या उत्पन्नात भर पडावी यासाठी राज्याचे तत्कालीन उप मुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी याठिकाणी दुबार वाहनकर सुरू करून पर्यटकांच्या खिशाला कात्री लावली आहे.दस्तुरी नाक्यावरील जागा ही वनखात्याच्या अखत्यारीत येत असल्याने भूभाडे म्हणून कुठल्याही प्रकारची वाहनांची काळजी न घेता वन समिती वाहन कर आकारणी करीत आहे.परंतु त्या मोटार गाड्या कशाप्रकारे पार्क केल्या जाव्यात याबाबत आजही उदासीन दिसून येत आहे.

## बनावट कागदपत्रांद्वारे कार विक्री; पिता-पुत्राविरुध्द गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर भागात राहणाऱ्या पिता-पुत्राने बँकेचे कर्ज असलेली त्यांची कार एका शिक्षकाला विवून त्याची ३ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे या पिता-पुत्राने कारवर वुठल्याही बँकेचे कर्ज नसल्याचे बनावट आरसी बुक देखील या शिक्षकाला दिल्याचे निदर्शनास अअले आहे. खारघर पोलिसांनी या पिता पुत्रावर फसवणूक तसेच बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणात फसवणूक झालेल्या शिक्षकाचे नाव आफाक अहमद मुश्ताक अहमद जमादार असे आहे. तर त्यांची फसवणूक करणाऱ्या पिता-पुत्राचे नाव वहीद सियतअली शेख आणि वसीम वहीद शेख अशी आहेत. आफाक जमादार कोल्हापूर येथे शाळेत शिक्षक आहेत. आफाक यांना सेकंडहॅन्ड कार खरेदी करायची असल्याने त्यांनी ओएलएक्सवर कारची शोधाशोध सुरु केली होती. त्यावेळी नोव्हेंबर महिन्यामध्ये त्यांना ओएलएक्सवर रिनोल्ट डस्टर कार विकण्यासाठी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी कार मालक वसिम शेख याला संपर्क साधला होता. त्यावेळी वसीम शेख याने सदर कार त्याच्या वडिलांच्या नावावर असून कारवर कुठल्याही बँकेचे कर्ज नसल्याचे सांगितले होते. तसेच कारची कागदपत्रे सुध्दा दाखविली होती. त्यानुसार त्यांच्यात २ लाख ८० हजार रुपयांमध्ये कार खरेदी-विक्रीचा व्यवहार ठरला. त्यानंतर काही दिवसांमध्ये वसिमला २ लाख ८० हजाराची रक्कम दिल्यानंतर वसिम शेख याने आफाक जमादार यांना खारघर मधील उत्सव चौकात कार आणि कारची कागदपत्रे दिली. त्यानंतर आफाक यांनी कार कोल्हापूर येथे नेऊन १ लाख रुपये खर्च करुन तिची दुरुस्ती करुन घेतली.

मात्र, आफाक यांना अचानक आर्थिक अडचण आल्याने त्यांनी महिन्याभरातच सदर कार ३ लाख ५० हजार रुपयांमध्ये विक्रीसाठी काढली. त्यासाठी आफाक आरटीओ कार्यालयात गेल्यानंतर कारवर आयडीएफसी फस्ट बँकेचे कर्ज असल्याचे त्यांना समजले. त्यानंतर वसीम शेख आणि वहीद शेख यांनी फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर जमादार यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार खारघर पोलिसांनी वसीम शेख आणि वहीद शेख या पिता-पुत्रावर गुन्हा दाखल केला. दरम्यान, आफाक यांनी विकत घेतलेल्या कारचे आयडीएफसी फस्ट बँकेचे हफ्ते थकल्याने, कार बँक जप्त करुन नेण्याची भिती असल्याने आफाक यांना सदर कार वापरताही येत नाही. तसेच तिची विक्री सुध्दा करता येत नसल्यामुळे त्यांची पंचायत झाली आहे.

## राजर्षी शाहू महाराज ऑनलाईन काव्यसंमेलन जल्लोषात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद,पुणे अंतर्गत कोकण प्रदेश, रत्नागिरी विभाग, मंडणगड तालुका शाखा आणि विद्यार्थी मदत संघटना, मंडणगड यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय ऑनलाईन राजर्षी शाहू महाराज काव्यसंमेलन गुगल मीट अँपवर मोठ्या जल्लोषात संपन्न करण्यात आले.

सदर काव्यसंमेलनाच्या सुरुवा-तीला संदीप तोडकर, अ.भा.म.सा.प. मंडणगड तालुका अध्यक्ष यांनी मान्यवरांचे स्वागत केले. नंतर संगीता पंदिरकर, मंडणगड उपाध्यक्षा यांनी सुरेल आवाजात गणेशस्तवन सादर करुन काव्यसंमेलनाची सुरुवात केली. तद्नंतर सचिन शिर्के यांनी जिजाऊ स्तवन सादर केले. संमेलनाध्यक्ष पद डॉ.अ.ना.रसनकुटे, अ.भा.म.सा.प. कोकण प्रदेशाध्यक्ष यांनी भुषवले. आपल्या ओघवत्या शैलीत त्यांनी शाहू महाराजांविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अलका नाईक, कोकण प्रदेश उपाध्यक्षा उपस्थित होत्या. त्यांनीही उपस्थित सारस्वतांचे मार्गदर्शन केले. विद्यार्थी मदत संघटनेचे अध्यक्ष राजेश इंगळे आणि पदाधिकारी यांची भाषणे झाली. तदनंतर राज्यभरातून संमेलनासाठी उपस्थित असलेल्या ३५ सारस्वतांनी आपल्या राजर्षी शाहू महाराज काव्यरचना सादर केल्या. शेवटी मंडणगड तालुका अध्यक्ष संदीप तोडकर यांनी संमेलनाध्यक्ष डॉ. अ.ना.रसनकुटे, प्रमुख अतिथी डॉ. अलका नाईक आणि उपस्थित सर्व मान्यवर तसेच सहभागी सारस्वतांचे आभार मानले. मंडणगड शाखेचे दुसरे ऑनलाईन काव्यसंमेलन सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झाले तर यापुढे असेच प्रेम मंडणगड तालुका शाखेवर सदैव ठेवावे ही भावना व्यक्त करुन सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले.

## वाढत्या वीज बिलासंदर्भात बहुजन मुक्ती पार्टीचे आंदोलन

**दै.रायगड नगरी । पेण**

मागील दीड वर्षांपासून कोरोनाचे संकट असताना अनेकांसमोर आर्थिक पेच निर्माण झाले आहे. त्यातच महाराष्ट्र विद्युत मंडळाचे वीज दर वाढत असल्याने या आर्थिक कोंडीत अधिक भर पडली आहे. त्यामुळे या वाढत्या वीज बिलांच्या विरोधात आणि राज्य सरकारने थकीत वीज बिल माफ करून नवीन बिल आकारणी करावी यासाठी आज पेणमध्ये बहुजन मुक्ती पार्टीच्या माध्यमातून आंदोलन छेडून तहसीलदारांना कंदील भेट देऊन निवेदन देण्यात आले.

सदर निवेदनामध्ये २०० युनिट पर्यंतचे वीज बिल माफ करण्यात यावे, मीटर भाडे कपात करण्यात यावी, विजेचा स्थिर आकारवर प्राथमिक भाव प्रमाणे दर आकारणी करण्यात यावी, सक्तीचे वीजबिल वसुली तात्काळ थांबवावी, ज्या ग्राहकांनी वीजबिल मार्च २०20 पासून भरले त्याचेसाठी अभय योजना तयार करावी व पुढील वर्षभरात वीजबिल निल पाठवावे, तीस दिवसानंतर रिडींग घेणाऱ्या व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी आदी प्रमुख मागण्यांचा समावेश करून नायब तहसीलदार सुनील जाधव यांच्याकडे लेखी निवेदनासोबत कंदील भेट देण्यात आले.

---

राव साहेब

अ‍ॅड.सुधीर एस.म्हात्रे
अ‍ॅड.कल्याणी म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.६०२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०७/२१

१) श्री.किशोर बाबुराव भगत
रा.०२, तळमजला, पारस प्लाझा, राम गणेश
गडकरी पथ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे वडील कै.बाबुराव अंबाजी भगत हे दि.१७/०१/१९९६ रोजी पॅरामाऊंट हॉस्पिटल, ता.पनवेल येथे मयत झाले. तसेच अर्जदार यांच्या आई कै.सुशिलाबाई बाबुराव भगत ह्या दि.२२/११/१९७४ रोजी घरीच म्हणजे ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले. अर्जदार यांची आजी व मयत कै.बाबुराव अंबाजी भगत यांच्या आई कै.हौसाबाई अंबाजी भगत ह्या दि.१०/११/४९ रोजी ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. अर्जदार यांचे भाऊ अविवाहित मयत कै.बाळकृष्ण बाबुराव भगत हे दि.११/१०/२००६ रोजी घरीच प्रभु आळी, ता.पनवेल येथे मयत झाले. त्याअर्थी अर्जदार श्री.किशोर बाबुराव भगत यांनी कै.बाबुराव अंबाजी भगत ह्यांचे सदरचा वारसदाखला हा भविष्यात/आवश्यकता लागल्यास केवळ गरजेचे असल्याने सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

वरील अर्जदाराने वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.६ माहे ०७/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

### जाहीर नोटीस

आमचे अशिल मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांनी खालील मिळकत विकत घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत १) कै.विनायक मोरेश्वर लेले, २) श्री.श्रीनिवास विनायक लेले यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांच्याकडून आमचे अशिल मे.श्री.समर्थ एंटरप्रायझेस यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| पनवेल | ३७१ | ३ (१) | पै. १७ गुंठे |
| पनवेल महानगरपालिका शहर विकास योजना अंतर्गत नवीन फायनल प्लॉट नं.४३२/२, क्षेत्र १३७८ चौ.मी. | | | |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०६/०७/२०२१

सही/-
अ‍ॅड.विजेंद्र नारायण मुंढे
पायोनिअर सोसाटी, स्वामी नित्यानंद रोड, तळमजला, ठाणा नाका, पनवेल

---

श्री.भाकरे साो.कोर्ट

वकील : के.बी. करावकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.६४९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०८/२१

श्री.सुनंदा बाबाजी खिलारी व इतर २ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.बाबाजी लक्ष्मण खिलारी यांचे दि.१७/०१/२०१७ रोजी निधन झाले आहे. सदर चौकशी अर्जाचे कामी अर्जदार क्र.१ श्रीम.सुनंदा बाबाजी खिलारी (पत्नी), २) श्री.मोहन बाबाजी खिलारी (मुलगा), ३) श्री.नयन बाबाजी खिलारी (मुलगा) यांनी कै.बाबाजी लक्ष्मण खिलारी यांच्या खालील नमूद मिळकती संबंधी वारस दाखला मिळण्याकरिता मा.न्यायालयात अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, येथील मातृछाया को.ऑ.हौ.सोसा. रुम नं.0 : ४, C-१५, क्षेत्र ४०.९७ चौ.मीटर कारपेट, घरकूल, सेक्टर १५, खारघर नवी मुंबई ४१०२१० ता.पनवेल, जि.रायगड**

याप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

सदरचे अर्जदार १ ते ३ हे कै.बाबाजी लक्ष्मण खिलारी यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या वारस हक्कांबाबत कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या ना.न्यायालयात आपली हरकत दाखल करावी. विहित मुदतीत हरकत न आल्यास ना.न्यायालयात दाखल केलेल्या अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदरकामी वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.०६/०७/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

श्री.राव साो.कोर्ट

अ‍ॅड.गुरुनाथ दत्ता भगत
अर्जदाराचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.६१३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/०८/२१

१) श्रीमती.हिरुबाई गजानन दमडे
वय : ७५ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.भरत गजानन दमडे
वय : ५६ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.जनार्दन गजानन दमडे
वय : ५७ वर्षे, धंदा : शेती
४) श्री.सुधाकर गजानन दमडे
वय : ५४ वर्षे, धंदा : शेती
५) श्री.तुलशीराम गजानन दमडे
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
६) श्री.राम गजानन दमडे
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.मुक्काम भंगारपाडा, पो.कुंडेवहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन-४१०२०६
७) सौ.अपेक्षा कृष्णा पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.विंधणे, ता.उरण, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ७ चे वडील मयत गजानन बाळू दमडे हे दि.०४/०३/२०१२ रोजी मुक्काम भंगारपाडा, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून, त्यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हे मयत गजानन बाळू दमडे यांचे कायदेशीर वारस आहेत तसा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केला आहे. मयत गजानन बाळू दमडे यांचे नावे खालील वर्णन केलेली मिळकत सिडको प्रशासनाने संपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु.केस नं. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| दापोली १९५ ए | दापोली | १२६ | २ | ०-१-४ | ०.३० रु.पै. |
| | दापोली | १२६ | ३ | ०-१७-० | ०.८० रु.पै. |
| दापोली १११ | दापोली | १२६ | १० ११ १४ | ०-४०-० | ३.३७ रु.पै. |
| | दापोली | ११५ | ५ | ०-१६-८ | ४.४४ रु.पै. |
| | दापोली | ७१ | ५ | ०-१४-० | ३.४४ रु.पै. |
| | दापोली | ७० | ६ | ०-३७-५ | ८.४४ रु.पै. |
| | दापोली | ११३ | ९ | ०-३२-० | ४.०० रु.पै. |
| दापोली २१५ | दापोली | ७१ | ४ | ०-२३-० | |
| | | ११५ | ४ | ०-१४-० | |
| | | १२६ | १३ | ०-०५-० | |

वरील अर्जदार कै.गजानन बाळू दमडे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती द्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.गजानन बाळू दमडे यांचे वारस दाखविल्यास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.०६/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मे.मुजावर साो

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.७७१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०८/२१

१) नरेश कृष्णा ठाकूर
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
२) उमेश कृष्णा ठाकूर
वय : ३६ वर्षे, धंदा : शेती
३) सौ.हर्षला सुनील पवार
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
कृष्णा ठाकूर, श्री हिनगिरी को.हौ.सो.,
प्लॉट नं.११९/१, रुम नं.१,
तळमजला, डायमंड पार्क जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.निर्जला विजय ठाकूर
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
विजय रंगनाथ ठाकूर, ८ चंदा गौरी,
नगर जवळ, ओमकार नगर चौपडा,
जळगाव, ता.जळगाव
५) सौ.उज्वला किशोरकुमार पवार
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
प्लॉट नं.४०२, गोविंद निरमन
मुंबई पुणे रोड, गार्डन हॉटेल,
पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ यांची आई कै.मंगळा कृष्णा ठाकूर ह्या दि.२९/०३/२०२१ रोजी मौजे : तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.मंगळा कृष्णा ठाकूर यांच्या ताबेकब्जातील सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकती**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| नावडे | नावडे फेज-२ | १५ | ४९९.९७ चौ.मी. |

सदरच्या मिळकती ह्या मे.एफ.एस.के. बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे डायरेक्टर सदरुद्दीन बशर खान यांच्याकडून दि.०१/०३/२०२१ रोजी त्रिपक्षीय कराराने मे.श्री गणेश बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्रीमती.मंदा रवींद्र बुधवंत, २) श्री.गिरीश कृष्णा खुटारकर, ३) श्रीमती.मंगळ महादेव अव्हाड, ४) श्री.हेमंत शांताराम दरे, ५) श्री.नितराज मनोहर खुटारकर, ६) श्री.रोहन हरिश्चंद्र भोईर, ७) श्रीमती.मंगळा कृष्णा ठाकूर, ८) श्रीमती.शर्मिला यशवंत बुधवंत यांनी विकत घेतली होती. सदर मिळकतीत कै.मंगळा कृष्णा ठाकूर यांचा ८ वा हिस्सा आहे. तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.मंगळा कृष्णा ठाकूर यांचे वारसदार या नात्याने कै.मंगळा कृष्णा ठाकूर यांचे सिडकोकडून बांधकाम परवानगी तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.मंगळा कृष्णा ठाकूर यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.०६/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## अलिबाग तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींसाठी कोविड-१९ लसीकरण मोहीम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना आणि तहसिल कार्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जनरल अरुण कुमार वैद्य, हायस्कूल अलिबाग येथे दिव्यांग व्यक्तींसाठी कोविड-१९ लसीकरण मोहिम संपन्न झाली.

यावेळी तहसिलदार सचिन शेजाळ, रायगड जिल्हा दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष साईनाथ पवार, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या लसीकरण मोहिमेत अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत चेंढरे, वरसोली, खंडाळे, वाडगाव वेश्वी, कुरूळ, बेलकडे, ढवर, थळबोरीस, मापगाव, चरी, खिडकी, शहापूर, आंबेपूर, पोयनाड, श्रीगाव कुसुंबळे, मान तर्फे झिराड, मुळे बामणगाव, बेलोशी पहरुर, पेढाबे, चिंचोटी, चौल, नागाव, सहाण, खानाव, रेवदंडा, आक्षी बेलकडे या ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना कोविड-१९ ची लस देण्यात आली.

## फुंडे महाविद्यालयात वीर तू.ह.वाजेकर जयंती संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**


फुंडे येथील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वीर तुकाराम हरी वाजेकर यांची ११५ वी जयंती साजरी करण्यात आली. जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालयात व्याख्यानाचे व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ.एस.बी.ओहोळ होते. उरण येथील जेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील यांनी वाजेकर जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षाचे वृक्षारोपण केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ओहोळ यांनी त्यांच्या नवोपक्रमाचे अभिनंदन केले. दुपारच्या सत्रात डॉ. विद्या नावडकर यांनी ' वीर वाजेकर जीवन व कार्य ' या विषयावर व्याख्यान दिले.डॉ. नावडकर यांनी तू.ह.वाजेकर यांच्या जीवनातील ठळक प्रसंग सांगून त्यांच्या कार्याची उपयुक्तता व महत्त्व विशद केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओहोळ यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात वाजेकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. तसेच रायगड जिल्हयात त्यांनी केलेले कार्य पुढच्या अनेक पिढयांना प्रेरणादायी राहील. असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.राम गोसावी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.आबासाहेब सरवदे यांनी तर आभार उपप्राचार्य प्रा.यु.टी. घोरपडे यांनी मानले. कार्यकमाचे नियोजन उपप्राचार्य डॉ. विलास महाले, प्रा. राम. गोसावी ऑफीस प्रमुख सौ. आहेर यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद उपस्थित होता.



# उच्च न्यायालयात चौपदरीकरणाबाबत जनहित याचिका अन् न्याय मिळेपर्यंत मानवी साखळी आंदोलन : संजय यादवराव

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील चौपदरीकरणाच्या कामामध्ये अनेक समस्या आणि त्रुटी महामार्गाच्या कामात असल्यामुळे या कामाबाबत हायकोर्टात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून न्याय मिळेपर्यंत महामार्गावर प्रत्येक दहा किलोमीटरवर समन्वय समिती मार्फत मानवी मनोरा तयार करून आंदोलन छेडले जाईल, असा सज्जड इशारा कोकण क्लबचे प्रणेते व पर्यटन तसेच जलनियोजनाचे मार्गदर्शक सामाजिक कार्यकर्ते संजय यादवराव यांनी येथे दिला.



यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, शिवसेना शहर प्रमुख सुरेश पवार, माजी पं.स.सभापती दिलीप भागवत, माजी उपसरपंच मंगेश नगरकर, रोकडे, देवळे सरपंच अनिल दळवी, सचिन शेठ, उदय खरे, प्रा.राठोड, प्रा.जाधव, मंगेश मोरे, प्रसाद मोरे यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते स्थानिक नागरिक व समन्वय समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पर्यटन, ऐतिहासिक गड किल्ले आणि सृष्टी सौंदर्याने नटलेली कोकणाची भूमी याकडे शासनाने नेहमीच दुर्लक्ष झाले आहे. कोकणाच्या विकासासाठी महामार्ग चौपदरीकरणाला ११ वर्षांपूर्वी सुरुवात झाली. मात्र, अद्यापही या कामात नियोजनाचा अभाव असल्याने अजून किती वर्षे लागतील, असा सवाल यावेळी संजय यादवराव यांनी उपस्थित केला. गेल्या वर्षापासून संबंधित कंपनीकडून चौपदरीकरणाच्या कामाला गती मिळाली असली तरीही सर्व्हिस रोड, गटारांचा प्रश्न, पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नियोजनशून्य कारभार दिसून येत आहे. पोलादपूर शहरात भूमिगत कामात होत असलेले सॉईल नेलिंगचे काम कमकुवत असून महामार्गावर रस्ता ओलांडताना नियोजनाविनाच उड्डाणपूल बांधण्यात आले आहेत. त्याठिकाणी मार्गदर्शक सूचना व फलक दिसून येत नसल्याने अपघाताची शक्यता असून काही ठिकाणी उड्डाणपूल बांधण्यात आलेल्या ठिकाणी महामार्गाच्या दोन्ही बाजूला गावे वसलेली आहेत. उड्डाण पुलाखालून प्रवास करताना नियोजनशून्य कारभारामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महामार्गाच्या कामात अशा अनेक समस्या आणि त्रुटी असल्यामुळे या कामाबाबत मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याबाबत न्याय मिळेपर्यंत महामार्गावर प्रत्येक १० किलोमीटरवर समन्वय समितीमार्फत मानवी मनोरा तयार करून आंदोलन छेडले जाईल, असा खणखणीत इशारा संजय यादवराव यांनी यावेळी दिला.

# नागोठणे पोलिसांकडून मुंबई गोवा महामार्गावर नाकाबंदी : दररोज हजारो रूपयांचा दंड वसुली




**दै.रायगड नगरी । वाकण**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने काही बाबतीत निर्बंध शिथिल केले असले तरी प्रवास करतांना शासनाने ठरवून दिलेल्या नियमावलीचे पालन न करणाऱ्या वाहनांवर व प्रवाशांवर पोलिसांकडून सर्वत्र कारवाईचा बडगा उगारला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुंबई गोवा महामार्गावरील येथील हायवे नाक्यावर नागोठणे पोलिस ठाण्याच्या पथकाकडून नाकाबंदी करुन हजारो रुपयांची दंड वसुली दररोज करण्यात येत आहे. त्यानुसारच सोमवार दि. ५ जुलै रोजी करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईत विना मास्क असणाऱ्या १४ प्रवाशांकडून प्रत्येकी ५०० रुपये प्रमाणे ७ हजार रुपये तर नियमापेक्षा जास्त प्रवाशी असणाऱ्या २० वाहन चालकांकडून ४ हजार रपये दंड वसूल करण्यात आला आहे.

नागोठणे पोलिस ठाण्याअंतर्गत मुंबई गोवा महामार्गावर करण्यात येत असलेल्या या दंडात्मक कारवाईत सपोनि विजयकुमार देशमुख, सहाय्यक पो.उ.नि. गणेश भऊड, स.पो.उ.नि. मोहन म्हात्रे, पो.ह. जितेंद्र चव्हाण, पो.ह. गणेश भोईर, महिला पो.ह. दया पाटील, महिला पो.ह. राजश्री तिवरे, पो.ना. गंगाराम डुमने, पो.ना. सचिन भोईर, महिला पो.ना. ज्योती भोईर आदींचे पथक सहभागी झाले होते. नागोठणे पोलिसांकडून दररोज सकाळपासून ते दुपारपर्यत नंतर पुन्हा संध्याकाळच्या वेळेत असे दोन वेळ महामार्गावर नाकाबंदी करण्यात येत असून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

## मुरुड-स्वारगेट गळक्या बसमधील भिजत प्रवास : आगार प्रमुखांनी घेतली दखल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड-स्वारगेट : गळक्या बसमधील प्रवाशांचा भिजत प्रवास या वृत्तपत्रातून आलेल्या वृत्ताची आगार प्रमुख यांनी दखल घेऊन या मार्गावर चांगल्या सुस्थितीतील गाड्यांची सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल प्रवासीवर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

पावसाळा सुरू होऊन महिना होतो न होतो तोच मुरुड आगारातील गळक्या गाड्या प्रवाशांची डोकेदुखी ठरत असून नुकताच मुरुड ते स्वारगेट असा गळक्या एसटी बस मधून भिजत प्रवास करावा लागल्याने प्रवासीवर्गातून नाराजीचा सूर दिसून आला होता. काही दिवसांपूर्वी मुरुड बस आगारातून सकाळी सात वाजता सुटलेल्या मुरुड-स्वारगेट बस क्र.एम.एच १४ बि टी.२६७० या गाडीतील प्रवाशांना अक्षरशः पाण्यातून प्रवास करण्याची पाळी आली.



सदर बस ही गळकी असून तिच्या वरील छतातून तर पावसाचे पाणी टपकत होतेच शिवाय बसच्या फ्लोअरींग पत्र्याच्या जोडणीतून खड्ड्यातील पाण्याचा अभिषेक प्रवाशांवर होत होता.त्यामुळे पुण्यापर्यंतचा प्रवास भिजत करावा लागला. सदरचे वृत्त वृत्तपत्रातून देण्यात आले होते. मुरुड पासून या बसमध्ये पावसाची संततधार सुरु असल्यामुळे त्याचा त्रास प्रवाशांना अधिक जाणवत होता.

वास्तविक कोरोनाच्या लॉकडाऊन नंतर अल्पप्रमाणात सुरु करण्यात आलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या व्यवस्थीत डागडुजी केलेल्या असाव्यात. अशी मागणी प्रवाशी व्यक्त करीत होते. सदरचे वृत्त वृत्तपत्रातून प्रसिद्ध होताच आगार प्रमुखांनी दखल घेऊन चांगल्या सुस्थितीतील गाड्यांची सेवा उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल प्रवासीवर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे.

## पनवेल तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ शिरढोण करिता शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्ह्यातील ग्रामीण स्तरापर्यंतच्या विविध शासकीय यंत्रणा बळकट करण्याचा ध्यास घेतला आहे. त्यापैकी पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाहीदेखील प्रलंबित होती. मात्र पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या विषयाबाबत गांभीर्याने पावले उचलत पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी शासकीय जमिनी देण्याची कार्यवाही अत्यंत तत्परतेने सुरू केली आहे.

त्याचबरोबर पशुवैद्यकीय दवाखान्यांसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून पशुवैद्यकीय दवाखाने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही सुरू करण्याबाबतीतही त्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ शिरढोण या इमारतीच्या बांधकामासाठी शासकीय जमिनीची मागणी होती, याबाबत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार ग्रामपंचायत शिरढोण हद्दीतील मौजे शिरढोण, ता.पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे.नं.३१ येथील एकूण क्षेत्र ०-०४३-०० हे.आर. पैकी ०-०५-०० हे.आर.जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही शासकीय जमीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड - अलिबाग यांच्याकडे शिरढोण येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ शिरढोण करिता हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतेच जारी केले आहेत. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला पशुवैद्यकीय सुविधा मिळण्याच्या दृष्टीने हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला आहे.

## नवघर गावाला कमी दाबाने पाणी पुरवठा ; ग्रामस्थांचे पाण्यावाचून हाल

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी विभागात सिडको हद्दीत असणाऱ्या नवघर गावाला गेल्या तीन महिन्यापासून कमी दाबाने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे जनतेची तहान भागली जात नाही या बाबत सिडको प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रार करूनही याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. पर्यायाने नवघर गावाला जास्तीत जास्त पाणी पुरवठा व्हावा अशी मागणी सरपंच आरती चौगुले यांनी केली आहे.

नवघर ग्रामपंचायत हद्दीतील लोकसंख्या ही जवळजवळ ४ ते पाच हजाराच्या आसपास आहे. द्रोणागिरी नोडच्या मध्यवर्ती ठिकाणी नवघर गाव येत असून सिडकोच्या विकासामध्ये नवघर गावचे मोलाचे योगदान आहे. १९८४ पासून नवघर गावाचे सिडकोसाठी योगदान आहे. एवढे योगदान असूनही याच भूमिपुत्रास पाणी मिळत नाही ही मोठी खेदाची बाब असल्याचे नवघर ग्रामपंचायतीच्या सरपंच आरती चौगुले यांनी म्हटले आहे. पूर्वी नवघर गावाला मुबलक पाणी पुरवठा केला जात होता. त्यावेळी कोणत्याही व्यक्ती पाण्यावाचून वंचित राहीली नाही. मात्र आत्ता सिडकोच्या काही अधिकाऱ्यांच्या आदमूठी धोरनामुळे कमी दाबाने पाणी पुरवठा केल्याने नवघर गावातील जनतेची तहान भागत नाही त्यामुळे जनतेतून संताप व्यक्त केला जात आहे.



## सुधागडात पावसाळी पर्यटनासाठी याल तर खबरदार; कारवाई करणार : विजय तायडे

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात विविध धरणे, किल्ले व ऐतिहासिक स्थळे आहेत. अनेक जण येथे पावसाळी पर्यटनासाठी येतात. पावसाळ्यात येथील गड, किल्ले आकर्षण ठरतात, तसेच निसर्गाने अंगावर ओढलेला हिरवागार शालू मन वेधून घेतो. नद्या, तलाव, गरम पाण्याचे कुंड, मन प्रसन्न व आल्हाददायक करणारे वातावरण पावसाळ्यात चोहोबाजूने पाहावयास मिळत असल्याने ठाणे, मुंबई, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली या ठिकाणाहून पर्यटक मोठ्या संख्येने वसईत दाखल होतात. पावसाळ्यात पाऊस आणि सोबत मित्र कंपनी असली की, पाण्यात डुबक्या मारायला, बागडायला मज्जाच मज्जा येत असल्याने सुधागडातील पावसाळी पर्यटन स्थळे पर्यटकांच्या पसंतीची पहिली केंद्रे ठरली आहेत. त्यामुळे सुधागडातील पर्यटन स्थळे नेहमी गजबजलेली असतात. मात्र कोरोना पार्श्वभूमीवर पावसाळी पर्यटनास बंदी आहे. तरीही नियम तोडून येणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करण्यात येईल अशी माहिती पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी दिली. आता पर्यटकांवर पोलिसांची करडी नजर राहणार असल्याने पर्यटकांच्या वर्षासहलीवर टाच बसली आहे.

## माथेरान मिनिट्रेन शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ : नागरिकांमध्ये समाधान

**दै.रायगड नगरी । माथेरान**

पर्यटनावर आधारित असलेल्या माथेरानच्या स्थानिकांची जीवनवाहिनी म्हणजे अर्थातच मिनिट्रेन असून पावसाळ्यात चार महिने नेरळ ते माथेरान दरम्यान ही सेवा बंद करण्यात येते. परंतु काही वर्षांपासून इथे अमन लॉज ते माथेरान स्टेशन या तीन किलोमीटरच्या अंतरासाठी शटल सेवा उपलब्ध असते.



मागील वर्षी आणि नुकताच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉक डाऊन मुळे ही शटल सेवा पर्यटकांअभावी बंद होती नाममात्र एक फेरी उपलब्ध होती. त्यामुळे लॉक डाऊन नंतर ह्या शटल सेवेतील फेऱ्यात वाढ होणे गरजेचे होते याठिकाणी सर्वसामान्य नागरिक त्याचप्रमाणे लहान मोठे हॉटेल व्यावसायिक यांचे जीवनमान येणाऱ्या पर्यटकांवर अवलंबून असते आणि पर्यटकांना अमन लॉज येथून गावात येण्यासाठी स्वस्त दरात केवळ शटल सेवा हाच एकमेव पर्याय उपलब्ध असतो. याकामी नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी १० जून रोजी मावळ मतदार संघाचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे आणि रेल्वेचे व्यवस्थापक शलभ गोयल यांच्याशी पत्रव्यवहार करून शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करण्याबाबत निवेदन दिले केले होते.

त्यानुसार खासदार बारणे यांनी दि.१४ जून रोजी रेल्वेचे व्यवस्थापक शलभ गोयल यांच्याशी पत्रव्यवहार तसेच फोनद्वारे संभाषण करून माथेरान करांचीही समस्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत असे सूचित केले होते त्यानुसार सोमवार ते शुक्रवार चार चार फेऱ्या आणि शनिवार रविवारी सहा सहा फेऱ्या करण्यात येणार आहेत. आणि जसजसे पर्यटन वाढेल त्याप्रमाणे ह्या फेऱ्यात आणखीन वाढ करण्यात येईल असे गोयल यांनी बारणे यांना सांगितले आहे. त्यामुळे आता इथे शटल सेवेच्या माध्यमातून पर्यटकांची संख्या वाढणार असून सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाले आहे. त्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.



# प्रियकराला वश करण्यासाठी तरुणीने गमावले ४ लाख ५७ हजार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काळी जादू आणि तंत्रमंत्र करुन प्रियकराला वश करुन देण्याचा बहाणा करुन एका बंगाली बाबाने खारघरमध्ये राहणाऱ्या २६ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनियर तरुणींकडून तब्बल ४ लाख ५७ हजार रुपये उकळल्याची घटना घडली आहे. वसीम रहीस खान उर्फ बाबा कबीर खान असे या बाबाचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह अनिष्ट, अघोरी कृत्य प्रतिबंधनिर्मुलन, काळी जादु या कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार २६ वर्षीय तरुणी खारघरमध्ये मैत्रिणीसह राहण्यास असून ती सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून एका आयटी कंपनीत कामाला आहे. या तरुणीचे एका तरुणासोबत मागील ३ वर्षापासून प्रेमसंबंध होते. मात्र, काही कारणांमुळे या दोघांमधील प्रेमसंबंध तुटल्याने सदर तरुणी मागील काही महिन्यांपासून प्रंचड मानसिक दडपणाखाली आली होती. या दरम्यान तरुणीला लोकलमधून प्रवास करताना बाबा कबीर खान बंगाली याची जाहिरात निदर्शनास आली होती. त्यात प्रेमसंबंधातील, घरगुती तसेच नोकरी व्यवसायातील अडचणी सोडविण्यासाठी उपाय करुन देण्याचे निदर्शनास आल्याने तरुणीने सदर जाहिरातीत दिलेल्या मोबाईल नंबरवर बाबा कबीर खान याला संपर्क साधला. तसेच तिचे प्रेमसंबंध तुटल्याचे आणि आपला प्रियकर आपल्यासोबत लग्न करण्यास तयार झाला पाहिजे यावर जादुटोणा करण्यास सांगितले. यावर बाबा कबीर खान याने मेरठ येथील दर्ग्यामध्ये काही पुजा विधी करण्यासाठी ३७ हजार रुपये खर्च येणार असल्याचे सांगितले. तसेच तिच्या प्रियकरावर काळी जादु तसेच मंत्र विधी केल्यास तिचा प्रियकर दुसऱ्याा मुलीकडे न जाता तिच्याकडे ओढला जाईल असे सांगितले.

त्यामुळे सदर तरुणीने बाबा कबीर खानवर विश्वास ठेवून त्याला ३७ हजार रुपये ऑनलाईन पाठवून दिले. मात्र, त्यानंतर देखील सदर तरुणीचा प्रियकर तिच्याकडे न आल्याने तिने पुन्हा बाबा कबीर खानला संपर्क साधला. यावर त्याने पुजेमध्ये अडचणी येत असल्याचे तसेच प्रियकराचे लग्न ठरले तर ते लग्न मोडण्यासाठी पुजा करावी लागेल. देवासाठी घुबड, बकरी अशा प्राण्यांचा बळी द्यावा लागेल. प्रियकराचे आणि तरुणीचे वुटुंब एकत्र येण्यासाठी वेगळी पुजा करावी लागेल, अशी वेगवेगळी कारणे सांगून तरुणीला पैसे पाठविण्यास भाग पाडले. तरुणीने देखील या बाबावर विश्वास ठेवून तो सांगेल तसेच पैसे पाठविले. अशा पध्दतीने ठकसेन बाबाने तरुणीकडून ४ लाख ५७ हजार रुपये उकळले.

मात्र, त्यानंतर देखील बाबा कबीर खानकडून प्रियकर वश न झाल्याने आपली फसवणूक होत असल्याचे तरुणीच्या लक्षात आले. त्यामुळे तरुणीने त्याला पैसे पाठविणे बंद केले. त्यानंतर तरुणीने वकिलासोबत सल्ला मसलत करुन गत मे महिन्यात पोलीस आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार खारघर पोलिसांनी बाबा कबीर खान विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे. तरुणीने आपल्या विरोधात पोलिसांकडे तक्रार केल्याचे बाबा कबीर खान याला समजल्यानंतर त्याने तरुणीवर सुध्दा काळी जादु करुन तिचा अपघात घडवून आणण्याची धमकी देण्यास सुरुवात केली. तसेच त्याने केलेल्या जादुमुळे तिची वाट लागेल, असेही या बाबाने तरुणीला धमकावले. तसेच काही दिवसानंतर तिचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन देऊन पुन्हा तिला काही रक्कम पाठविण्यास भाग पाडले होते. खारघर पोलिसांनी सदर प्रकाराची गंभीर दखल घेऊन या बाबा विरोधात फसवणुकीसह महाराष्ट्र नरबळी, इतर अमानुष, अनिष्ट,अघोरी कृत्य प्रतिबंध निर्मुलन, काळी जादु या कलमाखाली गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.